# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## (सकाळ)

जा.क्र. ६२३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०९/२०१७

**१) एटीएम द्वारे खात्यात पैसे ट्रान्सफर करण्यास लावुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/०९/२०१७ चे १०.०० वा. ते १५.३० वा दर. यातील फिर्यादी सुरेश नामदेवराव गभने वय ६६ वर्ष रा. तिलक वार्ड मोहाडी, यांना मोबाईल फोन वरून फोन आला की, तुम्हाला टाटा इंडीका कार बक्षीस मिळाली आहे, गाडीचे बुकिंग करीता ८,५००/रु इंशुरन्स व रोड टॅक्स करीता २५,२००/रु तसेच ट्रान्सपोर्ट खर्चा करीता ३८,५००/रु एटीएम द्वारे खात्यात ट्रान्सफर करण्यास लावुन, फिर्यादीची एकुन ७२,२००/रु ची फसवणुक केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४२० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

**२) एटीएम द्वारे वेगवेगळया खात्यात किस्त वाईज पैसे ट्रान्सफर करण्यास लावुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/०८/२०१७ ते ९/०८/२०१७ चे दर. यातील फिर्यादी सौ. पायल ज्ञानेश्वर डेकाटे वय ४५ वर्ष रा. तिलक वार्ड मोहाडी, यांना मोबाईल फोन वरूर मॅसेज आला की, तुमचा लकी ड्रा लागला असुन, टाटा सफारी लागली आहे ,गाडी कींवा नगदी १२,६०,०००/रु पाहीजेत काय असे म्हणाला, व नंतर मोबाईल वरून वेगवेगळया खात्यावर किस्त वाईज पैसे भरण्यास सांगीतले तेव्हा, फिर्यादीने आरोपीचे वेगवेगळया खात्यात २,५३,०००/रु भरून फिर्यादीची फसवणुक केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४२० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिरेऱ्हेपुंजे पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक ०४/०९/२०१७ चे ०७.३० ते १२.०० वा. दर. यातील फिर्यादी विनोद संभाजी मेश्राम वय ४५ वर्ष रा. बस्तरवारी वार्ड पवनी यांनी त्याची मोटार सायकल क्र. एमएच ३६ जे ६६३३ स्प्लेंडर प्लस काळया रंगाची कि. २०,०००/रु ची त्याचे घरासमोर ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

४) मोटार सायकलच्या धडकेत एकाचा मृत्यु :–

दिनांक १५/०८/२०१७ चे ०८.३० वा. दर. यातील मृतक दशरथ भदुजी उके वय ३८ वर्ष रा. चोवा हा स्वत:चे मोटार सायकलने पहेला वरून स्वगावी जात असता, विरूध्द दिशेने येणाऱ्या अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन मृतकचे मोटार सायकलला धडक मारून जखमी केल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता, उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो.स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क. ००/१७ कलम १७४ जा.फौ. चे कागज पत्रावरून सरतर्फे फिर्यादी पोना. भोगे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३९४(अ)भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. किचक पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

५) संगनमत करून रस्त्यावर पाणी गरम करण्याचे कारनावरून भांडण व शिवीगाळ करून ,जलावु काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ०४/०९/२०१७ चे २१.०० वा. दर. यातील फिर्यादी रमेश श्रावण बागडे वय ६२ वर्ष रा. सावरी / मुरमाडी यांचे घरासमोरील सिमेंटचे येण्या जाण्याचे रोडवर आरोपीतांनी नेहमी पाणी गरम करण्यासाठी विटेची चुल मांडल्याने, धुरामुळे व जाण्या येण्यास अडचण होत होती, घटने वेळी फिर्यादी हा त्याचे घरा समोरील सिमेंट रोडवर उभा असतांनी बोलला की, कोण पागल रस्त्यावर पाणी गरम करीत आहे, यावरून आरोपीतांनी संगनमत, भांडण करून आरोपी क्र.१ ने फिर्यादीस पाठीमागेहुन पकडले व आरोपी क. २ ने दोन्ही हातानी जलावु काठीने डोक्यावर मारले, व आरोपी क.३ ने जलावु काठीने डाव्या पायाचे टोंगळयावर, डावे खांदयावर मारून जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ.रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.टेंभुर्णे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

६) अवैध दारु अडयावर धाडी . :–

दिनांक ०५/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे कारधा,जवाहरनगर, ,सिहोरा पालांदुर,अडयाळ व लाखांदुर येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून ४७ लिटर हा.भ. दारू किंमती ३०५०/–रु. व ८२लिटर ६२० मिली लिटर देशी दारु + १ जिपगाडी किंमती २,२३,१४८/–रु. असा एकुण किंमती २,२६,१९८/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.